# मंत्रिमंडळ निर्णय

**४ ऑगस्ट २०१५**

**( मंत्रिमंडळ बैठक क्र.४२ )**

| अ.क्र. | विषय | विभाग |
| --- | --- | --- |
| १ | वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याचा निर्णय | सार्वजनिक आरोग्य |
| २ | मानवी अवयव प्रतिरोपण अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय | वैद्यकीय शिक्षण |
| ३ | मागासवर्गीय सूत गिरण्यांची अर्थसहाय्यासाठी निवड | वस्त्रोद्योग |
| ४ | महाराष्ट्र ॲक्युपंक्चर उपचार पद्धती विधेयकाचा मसुदा मंजूर | वैद्यकीय शिक्षण |

## वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याचा निर्णय

सार्वजनिक आरोग्य विभागातील आरोग्य सेवा संचालनालय आणि राज्य कामगार विमा योजेनतील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाची अंमलबजावणी ३१ मे २०१५ पासून पूर्वलक्षी प्रभावाने करण्यात येणार आहे.

आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यासाठी पदव्युत्तर पदविका व पदवीधारक अधिकाऱ्यांना अनुक्रमे तीन व सहा प्रोत्साहनात्मक वेतनवाढी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे तातडीने भरण्यासाठी ती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून वगळण्यासह  त्यांच्या निवडीची प्रक्रिया सुलभ करून त्यासाठी स्थापन केलेल्या स्वतंत्र निवड मंडळाच्या माध्यमातून नियुक्त्या करण्यात येत आहेत.  तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे कंत्राटी तत्वावर भरण्याचा निर्णय घेण्यात आला असून राज्यातील रुग्णालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सार्वजनिक आरोग्य सेवेतील वरिष्ठ अधिकारी, विशेषज्ञ  आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. तसेच रूग्णांना आरोग्य सुविधा पुरविण्यास अडचणी निर्माण होत असल्यामुळे गुणवत्तेवरही परिणाम झाला आहे.  या संवर्गातील ४४ मंजूर पदांपैकी केवळ ७ पदे भरण्यात आली असून ३७ पदे रिक्त आहेत. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या २८० पदांपैकी १५०, जिल्हा शल्य चिकित्सकांच्या ६२० पदांपैकी ३१४, विशेषज्ञांच्या ६९९ पदांपैकी ४८५ तर वैद्यकीय अधिकारी गट अ च्या ७ हजार ५७३ पदांपैकी २ हजार ६२३ पदे रिक्त आहेत. तसेच २०१७ पर्यंत वरिष्ठ पदांपैकी १९१, वैद्यकीय अधिकाऱ्यांची ४४८ अशी ६३९ पदे रिक्त होणार असल्याने आरोग्य विभागाच्या कामकाजावर परिणाम होणार आहे.

या निर्णयामुळे सध्या उपलब्ध असलेल्या आरोग्य सेवेतील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

-----०-----

## मानवी अवयव प्रतिरोपण अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय

मानवी अवयव प्रतिरोपण अधिनियमात केंद्राच्या धर्तीवर सुधारणा करून तो राज्यात लागू करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

मानवी अवयव प्रतिरोपण अधिनियम-१९९४ हा केंद्रीय अधिनियम देशात फेब्रुवारी १९९५ पासून लागू करण्यात आला. या कायद्यानुसार उपचाराच्या प्रयोजनासाठी मानवी अवयव काढून घेणे, त्यांचे जतन करणे आणि प्रतिरोपण करणे याबाबींचे विनियमन करण्यात आले आहे. तसेच या कायद्याद्वारे मानवी अवयवांच्या वाणिज्यिक व्यवहारास प्रतिबंध घालण्यात आले आहे.

या अधिनियमातील त्रुटी दूर करून मानवी अवयवांचे प्रतिरोपण अधिक सुकर व्हावे आणि मानवी अवयवांच्या वाणिज्यिक व्यवहारास परिणामकारक प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने केंद्राने २०११ मध्ये मानवी अवयव प्रतिरोपण (सुधारणा) अधिनियम-२०११ लागू केला आहे.

या सुधारणेमुळे अधिनियमाची व्याप्ती अधिक स्पष्ट होण्यास मदत होणार असून अधिनियमाचे विनियमन अधिक प्रभावी होईल. या सुधारणांमुळे अज्ञान व मतिमंद व्यक्तींसाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच मानवी अवयव प्रतिरोपण अपराधांसाठीच्या शिक्षेमध्ये वाढही करण्यात आली आहे.

-----०-----

वस्त्रोद्योग विभाग

## मागासवर्गीय सूत गिरण्यांची अर्थसहाय्यासाठी निवड

बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये अर्थसहाय्य करण्यासाठी राज्यातील तीन मागासवर्गीय सहकारी सूत गिरण्यांची निवड करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या गिरण्यांमध्ये श्री स्वामी समर्थ अनुसूचित जाती महिला सहकारी सूतगिरणी (इगतपुरी), श्री माता महाकाली महिला मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी मर्यादित सोनखेड (ता.लोहा, जि.नांदेड) आणि गोविंद मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी मर्यादित, माजलगाव (जि.बीड) यांचा समावेश आहे.

सहकारी सूत गिरण्यांच्या स्थापनेसाठी शासकीय भागभांडवल मंजूर करण्याची योजना सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातर्फे राबविण्यात येते. त्याअंतर्गत मागासवर्गीय सहकारी सूत गिरणीसाठी सभासद भांडवल पाच टक्के, शासकीय भागभांडवल ४५ टक्के आणि शासकीय कर्ज ५० टक्के याप्रमाणे अर्थसहाय्य करण्याचा आकृतीबंध आहे. या आकृतीबंधानुसार मागासवर्गीय सूत गिरण्यांसाठी शासकीय भागभांडवलाची रक्कम विशेष घटक योजनेंतर्गत वितरित करण्यात येते. ५० टक्के कर्जासाठी समाजकल्याण विभाग निधी उपलब्ध करून देतो. तसेच पाच टक्के सभासद भागभांडवलासाठी शेअर खरेदी करण्यासाठी ९० टक्के अनुदान देण्यात येते. या तिन्ही सुतगिरण्यांच्या उभारणीनंतर संबंधित क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार असून कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळून या क्षेत्रातील विकासास चालना मिळणार आहे.

राज्यात आतापर्यंत १४ मागासवर्गीय सहकारी सूत गिरण्यांची अर्थसहाय्य करण्यासाठी निवड करण्यात आली आहे. त्यातील नऊ सुतगिरण्या पश्चिम महाराष्ट्रात, दोन उत्तर महाराष्ट्रात तर तीन सुतगिरण्यांची नोंदणी मराठवाड्यात झालेली आहे.

-----०-----

वैद्यकीय शिक्षण विभाग

## महाराष्ट्र ॲक्युपंक्चर उपचार पद्धती विधेयकाचा मसुदा मंजूर

ॲक्युपंक्चर या उपचार पध्दतीचा विकास करण्यासोबतच त्यातील अध्यापन व व्यवसायाचे विनियमन करण्यासाठी महाराष्ट्र ॲक्युपंक्चर उपचार पद्धती विधेयक २०१५ या विधेयकाचा मसुदा आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आला. या निर्णयामुळे शासनाला या उपचार पद्धतीचे सुव्यवस्थित नियमन करणे शक्य होणार आहे.

ॲक्युपंक्चर उपचार पद्धतीत शरीरावरील विशिष्ट बिंदूंवर त्वचेतून सुयांद्वारे उपचार करण्यात येते. ही उपचार पद्धती दुखणे सुसह्य करणे व आजार बरा करणे यासाठी वापरण्यात येते. जागतिक आरोग्य संघटनेच्या अनुसार ही उपचार पद्धती वापरण्यात येत आहे.

-----०-----